# जिम कॉर्बेट ऑफ कुमाऊँ

**डी. सी. काला**

अनुवाद

**विश्वास भावे**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

Jim Corbett of Kumaon : D. C. Kala
Marathi translation by Vishwas Bhave
First published in English by Ravi Dayal Publisher, Penguin Books India 2009
Copyright © Penguin Books India and Ravi Dayal Publisher 2009
First published in Marathi by Riya Publications in arrangement
with Penguin Books India.

**जिम कॉर्बेट ऑफ कुमाऊँ :** डी. सी. काला

अनुवाद : विश्वास भावे

**प्रकाशक**

रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**

विश्वास भावे
बी/३३, डोंबिवली नागरिक
सो. फुले रोड, डोंबिवली(प.) ४२१२०२
मो.नं. : ९८२०४२४८६७ ईमेल: vshwas.bhave@gmail.com

**अक्षरजुळणी**

अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**

चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**

ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**

ऑगस्ट २०१६

**किंमत**

₹ २३०/-

## अर्पण

पक्ष्यांसाठी...
प्रेमपूर्वक!

## प्रस्तावना

हे पुस्तक कॉर्बेटच्या चाहत्यांसाठी, भारत देशावर या माणसाचे जे ऋण आहे ते फेडण्यासाठी लिहिले आहे. हे सांगायला मला लाज वाटत नाही की यातील बऱ्याच गोष्टी कॉर्बेटने लिहिलेल्यापैकीच आहेत. त्याने लिहिलेल्या सात पुस्तकांपैकी आज उपलब्ध असलेली सहा पुस्तकं मी त्याच्या चरित्र- लेखनासाठी नीट वाचली, पण कॉर्बेटने आणि त्याच्या एकूण तीन चरित्रकारांनी न लिहिलेल्या बऱ्याच गोष्टी या पुस्तकात आहेत. या चरित्रकारांपैकी पहिला मार्जोरी क्लाफ (दुसऱ्या महायुद्धाच्या काळात आग्र्याच्या अमेरिकन रेड क्रॉसचा संचालक) याने करंट बायोग्राफी (१९४६ सालची आवृत्ती) या पुस्तकासाठी साहित्य पुरवले. दुसरा लॉर्ड हॅले...युनायटेड प्रॉव्हिन्सचा (आत्ताचा उत्तर प्रदेश) गव्हर्नर होता आणि कॉर्बेटच्या शेवटच्या पुस्तकाला -ट्री टॉप्स- ला यानेच प्रस्तावना लिहिली होती आणि तिसरा, लंडनच्या ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेसचा जेफ्री कम्बर्लेज. याने कॉर्बेटच्या दोन पुस्तकांना- मॅनइटर्स ऑफ कुमाऊँ आणि १९६० मध्ये प्रकाशित झालेले 'टेम्पल टायगर'... या पुस्तकांना प्रस्तावना लिहिली होती.

कॉर्बेटच्या जीवनावरचा अभ्यास आणि मॅगीशी झालेल्या सविस्तर चर्चा यावर आधारलेले कम्बर्लेजचे चरित्र दर्जेदार आहे. मार्जोरी क्लाफ १९४७ पर्यंत अमेरिकन रेडक्रॉसमध्ये काम करत होती पण उपलब्ध असलेल्या तिच्या पत्त्यावर तिच्याशी संपर्क करण्याचे माझे प्रयत्न फोल ठरले. असेच कम्बर्लेच्या बाबतीतसुद्धा झाले आणि हॅले तर केव्हाच मृत्यू पावला होता.

१९७१ सालच्या एप्रिल महिन्यामध्ये मी सुट्टी घालवण्यासाठी 'भीम ताल'ला गेलेलो असताना कोणीतरी मला धरणाच्या काठावर असलेले कॉर्बेटचे 'फिशिंग लॉज' दाखवले. या लॉजच्या पूर्वीच्या रखवालदाराचा मुलगा चतुर सिंग हा कॅनॉल विभागात माळी म्हणून काम करत होता आणि त्याच्याशी बोलताना मला बऱ्याच कल्पना सुचल्या. कॉर्बेटबद्दलच्या साहित्याच्या शोधात नैनितालला गेलो असताना मला त्याच्या दोन भारतीय मित्रांच्या मुलांनी काही छान गोष्टी पुरवल्या. त्यानंतर मी डिस्ट्रिक्ट रेकॉर्ड रूम, रजिस्ट्रार कचेरी, सार्वजनिक

वाचनालय आणि म्युनिसिपल बोर्ड कचेरी एवढ्या ठिकाणी माहिती मिळवण्यासाठी भेटलो आणि माझे नशीब उघडले. मी तिथल्या रहिवासी गोऱ्या लोकांना आणि कालाधुंगीमधल्या 'छोटी हलद्वानी' या गावातल्या कुळवाड्यांना भेटलो. माहिती खणून काढण्याबाबत दाखवलेल्या सरकारी ढिलेपणामुळे मला हे मान्य करावे लागले की जे काही हातात आले ते फारसे समाधानकारक नाही पण नैनितालच्या सुस्वभावी लोकांकडून मात्र मला चांगलं सहकार्य मिळालं. त्यांच्या सहकार्याशिवाय हा प्रयत्न अगदीच अयशस्वी ठरला असता. मी जवळजवळ २०० पत्रं चाळली आणि तपासायला दिली. प्रतिसाद चांगला मिळाला. एका सूचनेवरून मी मुंबईला ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, इंडियाचा पूर्वी जनरल मॅनेजर असलेल्या आर. इ. हॉकिंसला भेटलो. त्याने मात्र मला पूर्वीचे काही साहित्य दिले आणि काही घटना सांगितल्या.

वाचकांनी कृपया लक्षात घ्यावे की काही ठिकाणांची, झाडांची, पक्ष्यांची आणि प्राण्यांची नावे कॉर्बेटपेक्षा वेगळी उच्चारली गेली आहेत. पण ही स्पेलिंग्स अचूक आहेत कारण मी स्वतःदेखील कुमाऊमध्येच वाढलो आहे. पण जिथे मी त्याच्या तोंडी वाक्ये टाकली आहेत तिथे मात्र मी त्याने लिहिलेलीच स्पेलिंग टाकली आहेत.

कॉर्बेटच्या पुस्तकांमधून घेतलेली वाक्ये, विधाने आणि तळटीपेत दिलेले संदर्भ मी खालील साहित्यातून घेतले आहेत;

मॅनइटर्स ऑफ कुमाऊँ, पिकॉक बुक, पेंग्विन बुक्स लिमिटेड– १९७०, मॅनइटिंग लेपर्ड ऑफ रुद्रप्रयाग, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, माय इंडिया, जंगल लोअर, टेम्पल टायगर, ट्री टॉप्स..ही कॉर्बेटची पुस्तके.

डी. सी. काला
नवी दिल्ली
फेब्रुवारी १९७९

✦✦✦

# *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १. | जिम कॉर्बेटची गोष्ट | ........................... | ९ |
| २. | कॉर्बेट कुटुंब | ........................... | १६ |
| ३. | बालपण | ........................... | २८ |
| ४. | रेल्वेचे दिवस | ........................... | ४९ |
| ५. | सिटी फादर आणि बिझिनेसमन | ........................... | ६१ |
| ६. | 'कार्पेट साहिब' | ........................... | ७६ |
| ७. | साप आणि भुते | ........................... | ९३ |
| ८. | शिकारी | ........................... | १०३ |
| ९. | निसर्गतज्ज्ञ | ........................... | ११९ |
| १०. | लेखक | ........................... | १३९ |
| ११. | ...जस्ट जिम | ........................... | १४७ |
| १२. | आफ्रिकेला प्रयाण | ........................... | १५७ |
| १३. | मृत्युपत्र | ........................... | १७६ |
| १४. | स्मारके | ........................... | १८१ |


✦✦✦

# १. जिम कॉर्बेटची गोष्ट

हे पुस्तक पृथ्वीवरील दोन खंडांच्या पार्श्वभूमीवर आहे; आशिया– जिथे लेफ्टनंट कर्नल एडवर्ड जेम्स कॉर्बेट, IARO, VD, OBE, CIE, कैसर–ए–हिंद[१] लहानाचा मोठा झाला आणि आफ्रिका– जिथे तो मृत्यूपूर्वीची काही वर्षे राहिला. त्याच्या विजयगाथा याच दोन देशांमध्ये घडल्या आहेत; भारत आणि केनिया. शेवटची सात वर्षे सोडली तर त्याचं संपूर्ण आयुष्य भारतातच गेलं. माणसांमधला वाघ, उपेक्षितांवर प्रेम करणारा, युद्ध आणि रोगराईच्या काळातील तारणहार, एक चांगला जमीनदार आणि मालक, संन्यासी, निसर्गप्रेमी आणि निसर्गतज्ज्ञ, उत्तर प्रदेशातील गढवाल, नैनिताल, अलमोडा या तीन जिल्ह्यांतील नरभक्षक वाघ आणि बिबळ्यांचा खातमा करणारा मसीहा...! इतरांनी देखील शिकारी केल्या पण याने लिखाणसुद्धा केले. त्याच्या सात पुस्तकांपैकी 'मॅनइटर्स ऑफ कुमाऊँ' या टायगर लँडमधल्या वावटळीने त्याला लाखो चाहते आणि जंगल स्टोरीज लिहिणारा खराखुरा साहित्यिक म्हणून मान्यता मिळवून दिली. या पुस्तकातील अचाट साहसकथांमुळे जगातील पाचही खंडांत त्याच्या चाहत्यांची फौज तयार झाली आणि अजूनही आहे.

एकमेव विजयगाथा सोडली तर आफ्रिकेतील कालखंड मात्र त्याच्यासाठी तसा वेदनादायक ठरला. त्याला तिथे सतत आजाराचा सामना करावा लागला आणि भारतातून ब्रिटिश गेल्यानंतर अनिश्चिततेच्या भावनेतून जसे बरेच ब्रिटिश दुसऱ्या वसाहतीत आश्रयासाठी गेले तसं त्याला सुद्धा राहावं लागलं. तसे त्याचे अगदी जवळचे दोन नातेवाईक तिथे होते आणि बरेच खास मित्र देखील होते– पण आपण त्याबद्दल नंतर बोलूया. त्याचे भारतातून झालेले प्रस्थान अगदी शांतपणे झाले. त्याच्या कोणत्याही कुळवाड्याला माहीत नव्हते की त्यांचा मालक जातोय आणि कुमाऊँला मागे राहणाऱ्या बऱ्याच गोऱ्या आणि निमगोऱ्या गरीब लोकांनासुद्धा माहीत नव्हते. हे गुपित फक्त त्याच्या अगदी जवळच्या मित्रांनाच माहीत होते..

1. Indian Army Reserve Of officers (IARO); VD, a decoration for voluntary officers; officer of the order of the British Empire (OBE); companion of the Indian Empire (CIE)

त्याच्या गावात नैनितालमध्ये तो सर्वांचा आवडता होता; सतत प्रसन्न, विनयी आणि गरीब-श्रीमंत सर्वांचे स्वागत करणारा. २८ वर्षे सिटी फादर म्हणून शहराची निसर्गसंपदा विध्वंसापासून सुरक्षित ठेवणारा म्हणून तो अजूनही सर्वांना आठवत राहील. त्याच्या कुळवाडी शेतकऱ्यांचासुद्धा तो अतिशय लाडका होता. कुमाऊँच्या पहाडी इलाक्यात सर्वत्र या शिकाऱ्याच्या आख्यायिका लोकगीतांमधून आणि 'कार्पेट साहिब' या नावाने हजारो कथांमधून जिवंत आहेत. त्या प्रांताचे होऊ घातलेले प्रधानमंत्री, जी. बी. पंत हे त्याचे जिवलग मित्र होते आणि त्या दोघांनी कित्येक दिवस तराईच्या जंगलात भटकंती करत एकत्र घालवले होते (जेव्हा जेव्हा पंत तुरुंगात नसतील आणि शहरात असतील तेव्हा). या दोघांनी तिथे एकत्र काम केले होते आणि एकत्र राहिले देखील होते. हा एकमेव राजकारणातील माणूस होता की जो कॉर्बेटला आवडायचा. एका जमिनीच्या व्यवहारामध्ये तर तो कॉर्बेटचा वकीलसुद्धा होता.

कॉर्बेटचे मन सदैव कुमाऊँमध्येच गुंतलेले असे; त्याचे हिवाळी निवासस्थान असलेले कालाधुंगी गाव आणि तिथून पंधरा मैल दूर असलेले नैनिताल...जिथे त्याचा उन्हाळ्यात मुक्काम असायचा. तो नेहमी म्हणत असे : ''मला कुमाऊँमध्ये परत जन्म घ्यायला आवडेल.'' केनियामधल्या ॲबर्डेयर नॅशनल पार्कच्या कुशीत वसलेल्या नैरी येथील आउटस्पन हॉटेलच्या बॅडन-पॉवेल कॉटेजमध्ये विश्रांती घेत असताना तो सतत त्याच्या पूर्वीच्या कुळवाड्यांबद्दल चिंता करत बसायचा- त्याने निघताना त्यांना ते कसत असलेल्या जमिनी देऊन टाकल्या होत्या- कधी बेरीबेरी झालेल्या एका मित्राला सल्ला दे तर कधी एका मित्राच्या बी. ए. झालेल्या मुलाला फाऊंटन पेन दे, कधी कालाधुंगीतलं त्याने विकलेलं घर त्याच्या कुळवाड्यांच्या फायद्यासाठी परत मिळवण्याचा प्रयत्न कर तर कधी त्यांच्या वतीने शासनाला ठरावीक वार्षिक ९१० रुपयांचा सारा भरत राहा असं करत तो सारखा त्यांच्या भल्याचा विचार करत बसायचा.

केनियाला असताना त्याचा इ.पी.गी. या निसर्गतज्ज्ञाबरोबर हॅले नॅशनल पार्कमधील वाघांबद्दल बराच पत्रव्यवहार सुरू होता; गी ने १९५४ साली या पार्कला भेट दिली होती आणि त्याने भारतातील त्याच्या मित्रांबरोबर केनियातील माऊ माऊ चळवळ आणि भारतातील स्वातंत्र्य चळवळ यांची तुलनासुद्धा केली होती. केनियामधून ब्रिटिश राजवट जाताना पाहण्याचा अपमानकारक प्रसंगसुद्धा त्याने पहिला होता. ६३ वर्षांच्या गोऱ्या राजवटीनंतर केनिया स्वतंत्र झाला. १९